# चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर.

१६ जुन, २०२०

☎ : 07172-264300
: 07172-255800



Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

✍: 7447744100 (PRO)


# स्थानिक गुन्हे शाखेची दारूतस्करांविरूध्द कार्यवाही

## १८ लक्ष ८ हजाराचा मुद्द्ेमाल हस्तगत

दिनांक १६/०६/२०२० रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक पोलीस स्टेशन रामनगर परिसरात पेट्रोलींग करीत असतांना गोपनीय माहिती मिळाली की, काही इसम प्रियदर्शनी चौक कडुन जल नगर वार्ड कडे एका स्कॉर्पिओ वाहनाने दारूची वाहतुक करणार आहे. अशी माहिती मिळताच जलनगर वार्ड चंद्रपुर येथे सापळा रचुन मिळालेल्या माहिती प्रमाणे एक संशयीत स्कॉर्पिओ वाहनास ताब्यात घेतले असता, वाहनामध्ये एक इसम मिळुन आला. सदर इसमास विचारपुस करून वाहनाची झडती घेतली असता, वाहनामध्ये ४८ बॉक्स ऑफीसर चॉईस विदेशी दारू किं. ९,६०,०००/—रू, एक प्लास्टीकच्या पिशवीत ९२ नग विदेशी दारू. किं. १८,४००/—रू, १३ बॉक्स देशी दारू किं. १,३०,०००/—रू आणि एक स्कॉर्पिओ वाहन क्र. एमएच ३१ डिव्ही ३४२९ किं. ७,००,०००/—रू, असा एकुण १८,०८,४००/—रू चा मुद्द्ेमाल हस्तगत करण्यात आला आहे. सदरचा गुन्हा पोलीस स्टेशन रामनगर येथे नोंद करण्यात आला असुन आरोपी नामे विष्णु घनश्याम खंजर वय ३४ रा. जलनगर वार्ड चंद्रपुर यास अटक करण्यात आली आहे. पुढिल तपास रामनगर पोलीस करीत आहे.

सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक डॉ.श्री. महेश्वर रेड्डी आणि अपर पोलीस अधीक्षक चंद्रपुर श्री. प्रशांत खैरे यांचे मार्गदर्शनात, स्थानिक गुन्हे शाखा पोनि. श्री. ओ.जी. कोकाटे यांचे नेतृत्वात पोहवा. राजेंद्र खनके, पोना. नईम पठाण, जमीर पठाण, अनुप डांगे, जावेद सिदद्ीकी यांनी पार पाडली.

———————————————————————————————————